भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.६०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०८/२०१७

१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून ,थापडबुक्यांनी मारहान करून, पाहुन घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक २९/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील आरोपीने सार्वजनीक ठिकाणी दारू पाणी पिवुन दारूचे नशेत फिर्यादीचे घरासमोर येवुन फिर्यादी व त्याचे वडील आजोबा यांना तुमचे घराचे खिडक्या उघडया का राहतात, व तुमच्या घरातुन कोणती बाई आवाज करते, असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून थापडबुक्यांनी मारहान केली, व पुढे पाहुन घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,२३२,५०४ भादंवि. सहकलम ८५(१) मदाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

२) ट्रॅक्टरच्या खाली दबुन इसम मरण पावल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ३०/०८/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील बिना नंबरचा नविन स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर शेतीमध्ये निष्काळजीपने, लापरवाहीने चालवुन फसल्याने त्यास काढण्याचा प्रयत्न करतांना निष्काळजीपने चिखल करित असतांना ट्रॅक्टर पल्टी होवुन स्वतः ट्रॅक्टरचे खाली दबुन मरण पावल्याने फिर्यादी प्रमोद वंसता ढेंगे वय ३१ वर्ष रा. कान्द्री यांचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.सोलंखी पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

३) विषारी औषध प्राशन करून उपचारादरम्यान इसमाचा मृत्यु. :–

दिनांक २९/०८/२०१७ चे १५.०० वा. दर यातील मृतक दिलीप शालीकराम गोमासे वय ४५ वर्ष रा. खरबी याने विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता १ दिवस खाजगी दवाखण्यात भरती करून उपचार करून रेफर झाल्याने पुढील उपचारास दि. २६/०८/२०१७ ला सा.रू. भंडारा येथे अती दक्षता विभागात भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमोवरून पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्रा वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिरेन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

४) शेत बांधीत विदयुत करंट लागुन इसमासह पाच म्हशीचा मृत्यु. :–

दिनांक ३०/०८/२०१७ चे ११.३० वा. दर यातील मृतक चिंतामण जैराम काळे वय ५२ वर्ष रा. लावेश्वर हा आपल्या म्हशी नेहमी लावेश्वर शेतशिवारात चारण्याकरीता घेवुन गेला असता, शेत बांधित विदयुत तार तुटुन, शेत बांधीत करंट आल्याने मृतक व त्याच्या ०५ म्हशी विदयुत करंट लागुन मरण पावल्याने फिर्यादी शैलेश दौलत काळे वय ३० वर्ष रा. लावेश्वर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.नी. ढोबळे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

५) अचानक प्रकृती बिघडुन महिलेचा मृत्यु. :–

दिनांक २९/०८/२०१७ चे १९.०५ वा. दर यातील मृतक अंबाबाई लक्ष्मण डहाके वय ४० वर्ष रा. दांडेगाव हिची प्रकृती अचानक बिघडल्याने, तिला औषधोपचारा करीता ग्रा.रू. लाखांदुर येथे नेवुन प्रथम उपचार करून, पुढील उपचारा करीता सा.रू.भंडारा येथे आनले असता, तेथील डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र.००/१७ कलम १७४ जा.फौ. चा दाखल करून मर्ग चे कागदपत्र मपोशी. धुर्वे यांचे हस्ते पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाने पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ३०/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली आहे त्यापैकी अवैध प्रवासी ०४, तीन सिटर वाहनांवरती १४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ९५ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.